# प्रकरण २. भारतीय शिल्पकला

## सिंधू संस्कृती

### ● पार्श्वभूमी :

भारतीय शिल्पकलेचा अभ्यास सिंधू संस्कृतीपासून करावा लागेल. कारण भारताची सर्वात प्राचीन असलेली संस्कृती म्हणजे सिंधू संस्कृतीच होय.

सन १९२१-२२ मध्ये सिंधू संस्कृतीचा शोध लागला. पंजाबमध्ये रावी नदीच्या काठी असलेल्या हडप्पा या ठिकाणी संशोधकांना काही मुद्रा सापडल्या. या मुद्रांवर प्राण्यांची चित्रे व चित्रमय लिपीतील मजकूर कोरलेला होता. त्यामुळे त्या ठिकाणी इ.स. १९२१ मध्ये रायबहाद्दूर दयाराम सहानी यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्यात आले. तेव्हा हडप्पा (हराप्पा) हे उत्कृष्ट रचनेचे शहरच जमिनीखाली गाडले गेल्याचे दिसून आले. त्यानंतर इ.स.१९२२ मध्ये श्री. राखालदास बॅनर्जींना मोहेंजोदारो शहराचा शोध लागला. १९३५ मध्ये श्री. एन.जी. मुजुमदार यांना छन्हुदारो (चन्हूदारो) या नगराचा शोध लागला. 'इंडियन आर्किऑलॉजिकल सर्व्हे' या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली हे उत्खननाचे काम करण्यात आले.

उत्खननात मिळालेल्या धातूच्या मूर्ती, मुद्रा, मातीची भाजलेली शिल्पे (टेराकोटा), दगडी शिल्पे यावरून या संस्कृतीमधील शिल्पकलेचे स्वरूप स्पष्ट होते. धातूची मोजकी व मातीची काही शिल्पे मिळाली आहेत. शिल्पकाम हे प्राथमिक स्वरूपाचे व प्रामुख्याने सांकेतिक पद्धतीचे आहे. अरुंद डोळे, ताठ मान, वरचा मिशी नसलेला ओठ, खालचा ओठ जाड ही मानवाकृतीची शारीरिक वैशिष्ट्ये आहेत. तेथे सापडलेल्या काही प्रमुख शिल्पांची माहिती पाहिल्यास ही वैशिष्ट्ये स्पष्ट होतील. साधारणपणे अकरा दगडी शिल्पे सापडली. त्यापैकी तीन प्राण्यांची आहेत.

### दाढीवाला पुरुष :

हे शिल्प सिंधू संस्कृतीमधील मोहेंजोदारो या ठिकाणी सापडले. ते पांढरट रंगाच्या चुनखडीच्या दगडात कोरले असून त्याची उंची ७.५ इंच (सुमारे १८ सेमी) आहे. तज्ज्ञांच्या मते ते एखाद्या धर्मगुरूचे किंवा सरदाराचे असावे. हे शिल्प पांढरट रंगाच्या चुनखडीच्या दगडात घडवण्यात आले आहे.



दाढीवाला पुरुष

त्याचे डोळे प्रदीर्घ व अर्धोन्मीलित आहेत. यावरून एखाद्या ध्यानस्थ योग्याची अवस्था दाखवण्याचा उद्देश या रचनेमागे असावा. डोक्यावरील व दाढीचे केस समांतर सांकेतिक पद्धतीने दाखवले आहेत. मेसोपोटेमिया मधील शिल्पांमध्ये याच सांकेतिक पद्धतीने केशरचना दाखवली जात होती. नाक काहीसे बोजड असून त्याचा शेंडा तुटलेला आहे. ओठ प्रमाणाने जाड आणि कपाळ अरुंद आहे. डोक्याभोवती एक फित बांधलेली असून समोरच्या बाजूस तिला एक वर्तुळाकार पदक जोडलेले आहे. कानाचे शिल्पकाम सांकेतिक पद्धतीने केलेले असून त्याला शिंपल्यासारखा आकार दिलेला आहे. कानाच्या बाजूस मानेवर दोन्ही

बाजूस छिद्रे आहेत. कंठहार अडकवण्यासाठी त्यांचा उपयोग केला जात असावा. इजिप्त व मेसोपोटेमिया येथील शिल्पांमधून अशीच रचना आढळून येते. या व्यक्तिशिल्पांतील व्यक्तीने अंगावर शाल पांघरलेली दाखवली असून ती उजव्या हाताखालून व डाव्या खांद्यावरून पांघरलेली आहे. या शालीवर त्रिदलीय आकाराची नक्षी कोरलेली आहे. या नक्षीच्या आतील भाग तांबड्या रंगाने रंगवलेला आहे. अशा प्रकारची त्रिदलीय नक्षी मध्यपूर्वेतील शिल्पावरून घेतलेली असावी. मानेवरील छिद्र, त्रिदलीय नक्षी यावरून इजिप्त व मेसोपोटेमिया येथील राजकीय, व्यापारी संबंध असल्याचे लक्षात येते. हे शिल्प भारतातील सर्वात जुना व्यक्तिशिल्पाचा नमुना आहे असे म्हणता येईल. हे शिल्प दिल्लीच्या राष्ट्रीय संग्रहालयात ठेवण्यात आले आहे.

### नर्तिका :



हे शिल्प सिंधू संस्कृतीमधील सर्वात प्रसिद्ध शिल्प होय. ही ब्राँझ धातूची ओतीव मूर्ती आहे. तिची उंची फक्त साडेचार इंच आहे. इतर शिल्पांप्रमाणे हे शिल्प वास्तववादी घडणीचे नाही. ते पूर्णतः सांकेतिक पद्धतीचे आहे. कृश शरीर, नळीसारखे हातपाय आणि खालचा जाड ओठ इत्यादी लक्षणांवरून नंतरच्या काळातील दक्षिण भारतीय मूर्तींशी असलेले तिचे साम्य लक्षात येते. हे शिल्प वास्तववादी नसले तरीसुद्धा तिच्यात एक प्रकारचा डौल, जोम व गतिमानता आढळून येते. त्यामुळे तिच्यातील जिवंतपणा दिसून येतो. सहजपणे उभ्या अस्लेल्या या नर्तिकेचा एक हात कमरेवर असून दुसऱ्या हातात खांद्यापासून मनगटापर्यंत बांगड्या भरलेल्या आहेत. यावरूनच सिंधू संस्कृतीमध्ये बांगड्यांचे अवशेष मोठ्या प्रमाणात का आढळून आले याचे स्पष्टीकरण मिळते. एवढ्या लहान शिल्पांमध्ये इतक्या बांगड्यांचे कोरीव काम व धातूचे ओतकाम तत्कालीन मूर्तिकारांचे ओतकामातील कसब व ज्ञान किती प्रगत होते याची साक्ष पटवते. या मूर्तीची केशरचना वैशिष्ट्यपूर्ण असून केसांच्या बुचड्यावर फुले माळलेली दिसून येतात. गळ्यामध्ये तिहेरी पदक असलेला एकच कंठहार दाखवला आहे. उजव्या बाहूवर बाहुभूषणे व मनगटावर तोडेही घातलेले दिसून येतात. चेहरा मोहक नसला तरीही रुबाबदार व प्रसन्न आहे. डोळे अर्धोन्मीलित आहेत. इ.स. पूर्व ३००० मधील ब्राँझ धातू, त्याच्या ओतकामातील कौशल्य या सगळ्यावरून तत्कालीन संस्कृती किती समृद्ध होती याची साक्ष पटते.

### मातृदेवता

सिंधू संस्कृतीमध्ये अनेक टेराकोटा शिल्पे आढळून आली. (टेराकोटा म्हणजेच मातीचे भाजलेले पक्के शिल्प) दगडाच्या शिल्पांच्या तुलनेत सहज उपलब्ध होत असलेल्या मातीचा वापर सिंधू संस्कृतीमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर करण्यात आला. यामध्ये अनेक स्त्री मूर्ती उत्खननात सापडल्या आहेत. त्यातीलच हे एक शिल्प आहे. ही मातृदेवता कमरेखाली आखूड वस्त्र नेसली आहे आणि ते ‘कमर’ पट्ट्याच्या साहाय्याने बांधले आहे. तसेच गळ्यात एक हार असून डोक्यावर पंख्याच्या आकाराचे मुकुटासारखे दिसणारे आभूषण आहे. त्याच्या दोन्ही बाजूस मोठ्या शिंपल्यांच्या आकाराचे पेले आहेत. या पेल्यांचा उपयोग वेगवेगळ्या

प्रसंगी तेलाचे दिवे लावण्यासाठी करण्यात येत असावा.

अशा प्रकारच्या काही मातृदेवतांच्या शिल्पांमध्ये कधी कमरेजवळ तर कधी छातीजवळ मातीचा गोळा लिंपून बालकाचे प्रतीक दाखवले जाई, तत्कालीन समाजातील मातेचे महत्त्व, जननक्षमता सुचवली जात असे. या अशा शिल्पांची जडणघडण लोककलेला साजेशी आहे. या शिल्पात ओबडधोबडपणा असला तरी सहजता दिसून येते. अशा प्रकारची अनेक मातृदेवता शिल्पे गृहकामात मग्न असतानाची, बालकांना खेळवताना, याच पद्धतीत टेराकोटा शिल्पे बनवली आहेत. या माध्यमातील माणसांची व प्राण्यांचीही शिल्पे उत्खननात आढळली.

## मुद्रा :

सिंधू संस्कृतीच्या संबंधात करण्यात आलेल्या उत्खननात बऱ्याच मोठ्या संख्येने उपलब्ध झालेल्या महत्त्वपूर्ण वस्तू म्हणजे तेथील प्राचीन शहरात मिळालेल्या शेकडो मुद्रा होत. याच पद्धतीच्या अशा मुद्रा मेसोपोटेमिया येथे ही आढळून आल्या त्यामुळे इतिहास तज्ज्ञांना सिंधू संस्कृतीचा कालखंड निश्चित करण्यात मदत झाली. या मुद्रा स्टिएटाईट दगडात कोरलेल्या आहेत. एखाद्या व्यापारी स्वरूपांच्या करारनाम्यावर उमटवण्यासाठी त्याचा उपयोग केला जात असावा. या मुद्रांना वरच्या बाजूला दोरा ओवता येईल असा कडीचा आकार आहे. त्यामुळे गळ्यातील ताईत म्हणूनही याचा उपयोग केला जात असावा हा ताईत गळ्यात घातल्यामुळे संकटापासून रक्षण होते अशी श्रद्धाही त्यावेळी असू शकते.

## मुद्रांचे निर्मिती तंत्र :

सिंधू खोऱ्यात उत्खननात सापडलेल्या मुद्रा या कला व कारागिरीचा उत्तम नमुना म्हणता येईल. सिंधू संस्कृतीमधील या मुद्रा वेगवेळ्या प्रकारच्या, आकारांच्या आहेत. त्या प्रामुख्याने चौरसाकृती व आयताकृती आहे. काही वर्तुळाकार तर काही दिर्घ वर्तुळाकारात आहेत. सामान्यपणे त्यांचे आकारमान लहान होते. त्यांच्या या अशा आकारासाठी अर्थातच लहान लहान तीक्ष्ण हत्यारांचा उपयोग करण्यात येत असे. एमरीसारखे साहित्य वापरून त्याचा पृष्ठभाग गुळगुळीत करण्यात येत असे. पॉलिश झाल्यानंतर त्यावर अल्कली द्रव्याचा थर देण्यात येई व ती मुद्रा अल्पकाळ भाजली जाई त्यामुळे त्या स्टिएटाईट दगडाला एक प्रकारचा शुभ्र चकचकीतपणा प्राप्त होत असे. विशेष बाब म्हणजे या मुद्रांवरील कोरीव काम, खोद मुद्रा पद्धतीने ऋण उठावात केले जाई. मातीसारख्या किंवा मेणासारख्या मऊ पदार्थावर मुद्रेचा छाप उठवताना जो भाग उठावाचा हवा असेल तो मुद्रेवर उलटा म्हणजे खोल खोदला जात असे.

## मुद्रांवरील कोरीव कामांचे विषय :

या मुद्रांवर केलेले कोरीव काम हे कौशल्याने व सफाईदारपणे केलेले आहे. त्यावर अनेक प्राण्यांची शिल्पे कोरण्यात आली आहेत. आखूड शिंगे असलेला बैल, हत्ती, काळवीट, कुत्रा, रानबकरा, वाघ, सुसर, गेंडा इत्यादी प्राण्यांचे शिल्पांकन केलेले असून, काही ठिकाणी काल्पनिक प्राण्यांचेही शिल्पकाम केले आहे. काही ठिकाणी विचित्र स्वरूपाच्या मानवाकृतीही आढळतात. काही ठिकाणी तत्कालीन लिपीत काही मजकूर लिहीलेला आढळून येतो. ही लिपी वाचण्यात अद्यापपर्यंत पूर्ण यश मिळाले नसले तरी प्रयत्न चालू आहेत.

## मुद्रांचे कलात्मक व ऐतिहासिक महत्त्व :

सिंधू नदीच्या खोऱ्यात केलेल्या उत्खननात या मुद्रांचे सर्वात महत्त्वपूर्ण योगदान आहे. यातून परिपूर्ण कौशल्याचा विकास झालेला आढळून येतो. वास्तववादी पद्धतीने व सांकेतिक पद्धतीने अशा दोन्हीही प्रकारे हे शिल्पकाम केलेले आहे. चित्रण परीपूर्ण व्हावे या करिता इजिप्शियन संस्कृतीप्रमाणे समोरून पाहिल्यानंतर दिसतील असे शरीराचे काही भाग सन्मुखतेच्या नियमाला अनुसरून दाखवले

आहेत. प्राण्यांचे चित्रण परिणामकारक असण्यासाठी आवश्यक तेवढाच शरीराचा भाग दाखवला आहे.या मुद्रांवरून सिंधू संस्कृती मधील लोकांच्या धर्मकल्पना, व्यवसाय, अन्य संस्कृतीशी संबंध इत्यादी ऐतिहासिक माहिती मिळते.

### वृषभ मुद्रा :

सुप्रसिद्ध वृषभ मुद्रा पाहिली असता बैलाची ताकद, जोम व चैतन्य दाखवण्यासाठी मानेखालील कातड्याच्या घड्या, मांसल व हाडांचे कठीण भाग इत्यादींचे चित्रण समर्थपणे केल्यामुळे या बैलाची भरीव घनता आणि प्रचंड वजनदारपणा यामुळे हे शिल्प सौंदर्याचा अप्रतिम नमुना बनला आहे. शरीराचे वजन सहजपणे तोलणारे आखूड पाय या गोष्टी वास्तवतेचा भास निर्माण करतात.

सिंधू संस्कृतीमधील धर्मकल्पना, व्यवसाय, चालीरिती, रुढी परंपरा अन्य संस्कृतीशी (उदा. मेसोपोटेमिया) संबंध याविषयांची माहिती मिळते. पशुपतिनाथाच्या मुद्रेत शिंगे असलेली मानवी आकृती शिव-पशुपती या देवतेचे प्राचीन रूप आहे. डोक्यावरील भागात कोरलेला त्रिशूळ, सभोवती प्राण्यांची चित्रणे इत्यादींवरून भारतीय कलेत आढळणारे एखाद्या देवतेचे मानवी स्वरूपातील सर्वात प्राचीन शिल्पांकन या मुद्रेत आढळते असे म्हणावयास हरकत नाही. दोन श्वापदांच्या माना मुरगळणारा वीर, तीन शिरांचा विचित्र प्राणी तसेच बऱ्याच मुद्रातील पौराणिक कथांचा संबंध व प्रत्यक्ष मुद्रा मेसोपोटेमिया या ठिकाणी आढळून आल्या आहेत. त्यावरून तत्कालीन दोन संस्कृतींमध्ये असलेले व्यापारी संबंध लक्षात येतात.



## ● मौर्य काळ

### ● पार्श्वभूमी :

भारतीय शिल्पकलेचा अभ्यास करत असताना स्तंभ महत्वपूर्ण ठरतात. मौर्यकाळात सम्राट अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रचारार्थ पिवळ्या वालुकाश्मात घडवलेले सुमारे ३० स्तंभ उभारले. त्यातील आज केवळ १३ स्तंभ उपलब्ध झाले आहेत. या स्तंभाची सरासरी उंची ४० फूट एवढी आहे. त्यांची स्तंभशीर्षे एक किंवा अनेक प्राण्यांच्या शिल्पांनी मंडित असून ती शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने म्हणून गणली जातात. या सर्व स्तंभांच्या दंडावर अशोकाच्या सुप्रसिद्ध चौदा आज्ञा कोरलेल्या आहेत. स्तंभाचा आकार दंडगोल आकाराचा व वर निमुळता होत गेलेला दिसतो. सर्व स्तंभांचे दंड एकसंघ दगडाचे बनवलेले असून वरील स्तंभशीर्ष आणि तो दंड यांच्यामध्ये तांब्याची खीळ बसवून ते भाग एकमेकांना जोडले जात असत. हे स्तंभ स्मारकस्तंभाप्रमाणे मोकळ्या पटांगणात सुटे उभे केले होते. त्यांना खालच्या बाजूस पायासारखी स्वतंत्र रचना नाही. ते सरळ जमिनीवर उभे केलेले होते. सम्राट अशोकाने ही संकल्पना इराणी कलेतून घेतली असावी. इ.स. पूर्व ५व्या शतकात इराणी सम्राट दरायस याने जागोजागी स्तंभ उभारून त्यावर राजाज्ञा कोरलेल्या होत्या. अशोकाने धर्माज्ञा कोरल्या हा महत्त्वाचा फरक आहे. मौर्यकाळातील या शिल्पांचे वैशिष्ट्य म्हणजे चकचकीत झिलई होय. या काळातील काही महत्वपूर्ण स्तंभापैकी दोन महत्त्वाच्या स्तंभशीर्ष शिल्पांची माहिती पाहू.

(१) सारनाथ सिंह स्तंभशीर्ष
(२) वृषभ स्तंभशीर्ष

### सारनाथ सिंह स्तंभशीर्ष

बुद्धांनी ज्ञान प्राप्त केल्यानंतर पहिले धर्मप्रवचन सारनाथ येथे केले. या घटनेचे स्मारक म्हणून सम्राट अशोकाने इ.स. २४०च्या सुमारास त्या ठिकाणी एक स्तंभ उभारला होता. तेथे करण्यात आलेल्या उत्खननात

स्तंभाचे तुटलेले भाग व बऱ्याच प्रमाणात शाबुत असलेले स्तंभशीर्ष सापडले. पाठीला पाठ असलेल्या या चार सिंहाच्या डोक्यावरती आणखी एक मोठे चक्र होते. ते शेजारीच तुकड्यांच्या अवशेषाच्या स्वरूपात आढळून आले. हे स्तंभशीर्ष व अवशेष सारनाथच्या पुराण वस्तूसंग्रहालयात ठेवण्यात आले आहेत.



सारनाथ सिंह स्तंभशीर्ष – सारनाथ

सिंह स्तंभशीर्षाचे तीन मुख्य भाग सहज लक्षात येतात. सर्वात खाली घंटेच्या आकाराचे उलटे कमळ व त्यावर दोन कडी आहेत. खालच्या बाजूचे कडे लहान तर वरच्या बाजूचे कडे आकाराने थोडे मोठे आहे. त्याच्यावरील दुसरा भाग म्हणजे चारही कोपरे कापलेल्या चौकोनी आकाराचा स्तंभशीर्ष फलक होय. हा आकार अनियमित अष्टकोनी आहे. वरील तिसरा महत्त्वाचा भाग पुढील पायावर तोल सांभाळून व पाठीला पाठ लावून बसलेल्या चार सिंहांच्या आकृतीचा आहे. या शिल्पातील घंटेच्या उलट्या आकाराचे कमळ इराणमधील दरायसच्या राजवाड्यातील स्तंभावरून घेतलेले आहे असे मानले जाते. या कमळाच्या पाकळ्या सरळ खाली पडलेल्या आहेत. सारनाथच्या स्तंभशीर्षामधील पाकळ्यांची घडण बाकदार, वक्र रेषांची व अलंकृत आहे. त्यामुळे ती अधिक मनोहर व चैतन्यपूर्ण बनली आहे. स्तंभशीर्ष फलकाच्या जाडीच्या बाजूवर चारी दिशांना चार धर्मचक्रे कोरलेली आहेत.

या ठिकाणी प्रथमतः धर्मचक्र परिवर्तन केले. त्यामुळे चक्राचे आकार कोरण्यात आले असावे. प्रत्येक दोन धावत्या प्राण्यांच्यामध्ये एक धर्मचक्र याप्रमाणे बैल, घोडा, सिंह, हत्ती या चार प्राण्यांची सुरेख शिल्पे उठावात कोरली आहेत. हे प्राणी धावत्या अवस्थेत दाखवण्याचा हेतू धर्मचक्राची गती सूचित करण्याचा असावा या उद्देशाखेरीज त्या प्राण्यांची प्रतीकात्मतादेखील लक्षणीय आहे. बौद्ध धर्मात या चार प्राण्यांना प्राप्त झालेले महत्त्व बुद्धाच्या जीवनाशी असलेल्या त्यांच्या संबंधांमुळे आहे. गौतमाच्या गर्भवती आईला स्वप्नात एक श्वेत हत्ती दिसला व गौतमाचा जन्म वृषभ राशीत झाला. त्यामुळे हत्ती व बैल यांना बुद्धाची प्रतीके म्हणून धार्मिक महत्त्व प्राप्त झाले. तसेच कंटक नावाच्या घोड्यावर बसून तो सर्वस्व त्याग करून निघून गेला म्हणून घोड्याला महत्त्व मिळाले. त्याच पद्धतीने सिंह हा राजऐश्वर्याचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे बौद्ध धर्मात सिंहाला बुद्धाचे प्रतीक मानले जाऊ लागले. या चार प्राण्यांचे वास्तव व जोशपूर्ण कोरीव काम हे ग्रीक शिल्पातील प्राण्यांच्या आकृतींचे स्मरण करून देते. चार दिशांना चार तोंडे असलेले सिंह चारही दिशांना बौद्ध धर्माचा संदेश प्रसारित करीत आहेत असे जाणवते तसेच सिंह हा राजसत्तेचे प्रतीक म्हणूनही ओळखला जातो. सिंहाला सूर्याचे प्रतीक म्हणूनही ओळखले जाते. अज्ञानरूपी काळोखाला नष्ट करून ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र प्रसारित करण्यासाठीही सिंहाच्या प्रतिमा वापरण्यात आल्या असाव्यात. सिंहाच्या चेहऱ्यावरील हावभाव, डोळ्यांचा त्रिकोणी आकार आणि विशेषतः या शिल्पावरील चकचकीत झिलई हे विशेष इराणी सिंह-शिल्पात आढळतात. या चकचकीत झिलईसाठी इराणी शिल्पकार भारतात वास्तव्यास होते हे लक्षात येते. सिंहाच्या डोक्यावर एक धर्मचक्र होते त्याचे अवशेष सापडले आहेत. त्यावरून धर्मप्रसाराचा हेतू स्पष्ट होतो. हा स्तंभशीर्ष चुनार खाणीतील एकसंध पिवळ्या वालुकाश्मात कोरला आहे.

सर्वधर्म समभाव बाळगणाऱ्या सहिष्णु व उदारमतवादी भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे हे लक्षात

घेऊन या शिल्पाला राजमुद्रा म्हणून स्वीकारण्याचे औचित्य स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने दाखवले ते सर्वथा योग्यच आहे.

### रामपूर्वा येथील वृषभस्तंभशीर्ष

बिहार राज्यातील रामपूर्वा येथे सापडलेल्या पिवळ्या वालुकाश्मातील वृषभ स्तंभशीर्ष मौर्यकालीन शिल्पकलेतील उत्कृष्ट शिल्प म्हणून ओळखले जाते. ते सध्या कोलकाता येथील इंडियन म्युझियममध्ये ठेवले आहे. याची उंची २०५ से.मी. आहे.

या शिल्पाच्या ठिकाणी दर्शवलेल्या सर्व बारकाव्यांवरून, बैलाच्या शरीरयष्टीवरून हे शिल्प निश्चितच भारतीय बैलाचे असल्याचे जाणवते. आखूड शिंगे, पायाची कमी उंची, उभारलेले कान, मोठे वशिंड, बळकट शरीर ही वैशिष्ट्ये या शिल्पात आढळतात. बलदंड व शक्तिशाली रूप असूनसुद्धा तो नम्रतेने उभा आहे. यातून त्याच्या सौंदर्यात आणखी भर पडते. डौलदारपणा, बलदंड शरीर व शक्तिशाली रूप हे भारताच्या कृषिप्रधानता, उद्यमशीलता व शक्तीचे प्रतीक वाटते. या स्तंभातील स्तंभशीर्षाखाली जाडजूड अशा वर्तुळाकृती स्तंभशीर्ष फलक आहे. त्यावर ताड वृक्षाच्या पानाचे अलंकरण कोरलेले आहे. त्याच्याखाली घंटेच्या आकाराचे उलटे कमळ कोरलेले आहे.



वृषभस्तंभशीर्ष – रामपूर्वा

### यक्ष – पाटणा :

सम्राट अशोकाच्या कालखंडात बौद्ध धर्माच्या प्रचारार्थ मोठ्या प्रमाणात शिल्प निर्मिती करण्यात आली. अर्थात या शिल्पाचे विषय हे बौद्धधर्मीय होते असेच एक शिल्प बिहार येथे सापडले असून पाटणा संग्रहालयात ठेवलेले आहे. त्याच्या शारीरिक ठेवणीतून व कपड्यांवरून ते यक्षाचे असावे. ते इ.स.पू दुसऱ्या शतकातील आहे. हे शिल्प शिरविरहीत आहे तसेच या शिल्पाचे दोन्ही हात तुटलेले आहेत. या शिल्पाची उंची १६५ से.मी आहे. मौर्य काळातील शिल्पातील व दगडीकामातील महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे चकचकीत झिलई. ती या मूर्तीच्या वरच्या भागावर व पायावरती दिसून येते. मूर्ती घडवीण्यासाठी तांबड्या वालुकाश्माचा उपयोग करण्यात आलेला आहे. ही यक्ष प्रतिमा एखाद्या आज्ञाधारक द्वारपालासारखी अथवा चवरी ढाळणाऱ्या सेवकासारखी आहे. चवरी म्हणजे पांढऱ्या धाग्यांपासून बनवलेले हवा घालण्यासाठी वापरण्यात येणारे साधन होय. तुटलेल्या उजव्या हातात त्याने चवरी धरलेली असावी. हे तुटलेल्या हाताच्या मुठीत दिसणाऱ्या चवरीच्या दांड्यावरून स्पष्ट दिसते. दोन्ही दंडावर बाहुभूषणे, गळ्यात जाडजूड अशी मोठी माळ आहे. शरीर स्थूल असून कमरेभोवती धोतरासारखे वस्त्र आहे. त्याचा सोगा डाव्या खांद्यावरून घेतलेला आहे. वस्त्रावरील कमरपट्टा ठसठशीत कोरला आहे. या शिल्पावर इराणी शिल्पशैलीचा प्रभाव जाणवतो मात्र त्याची जडणघडण पूर्णपणे भारतीय पद्धतीची आहे. भारदस्तपणा, भक्कमपणा व घनता या शिल्पातून दिसते.

### चामरधारिणी (दिदारगंज यक्षिणी) :

बिहारमधील दिदारगंज येथे सापडलेली ही यक्षिणीची मूर्ती उत्तर मौर्यकालीन शिल्पाचा सुंदर नमुना आहे. सध्या ती पाटणा येथील कलासंग्रहालयात ठेवण्यात आलेली आहे. तिच्या उजव्या हातात चामर असून डावा हात खांद्यापासून तुटलेला आहे. ती इ.स.पूर्व पहिल्या शतकातील असून तिच्यावर मौर्यकालीन झिलई आहे. या मूर्तीची उंची १६० से. मी. असून तिचा कमरेचा वरील भाग अनावृत्त आहे. शरीराच्या वरील दागिन्यांचे कोरीव काम अप्रतिम आहे. चेहरा अंडाकृती घाटाचा असून त्यावरील अवयव व केशकलाप अत्यंत व्यवस्थितपणे कोरलेले आहेत. शरीर हे बांधेसूद असून यावरून स्त्रीसौंदर्याची कल्पना येते. चेहऱ्यावरील व हातापायावरील कोरीव कामात सफाईदारपणा जाणवतो कपड्यावरील कोरीव काम तेवढे सफाईदार वाटत नाही. एकंदरीत मौर्यकाळातील शिल्पकलेचे विकसित स्वरूप या शिल्पात पहावयास मिळते.

## कुशाण काळ

### पार्श्वभूमी

### ● गांधार शिल्प शैली :

कुशाणवंशीय राजांनी बौद्‌ध कलेचा विकास केला, या काळात गांधार येथील तक्षशिला व उत्तर भारतातील मथुरा ही बौद्‌धकलेची प्रसिद्‌ध केंद्र होती.

सिंधू नदीच्या काठापासून कंदाहारपर्यंतचा प्रदेश ‘गांधार’ या नावाने पूर्वी ओळखला जात असे. भारताच्या सरहद्‌दीवरील प्रदेश असल्यामुळे भारतावर झालेल्या आक्रमणांची झळ या प्रांतास पोहोचली. त्यामुळे अनेक परदेशीय संस्कृतींचा परिणाम या प्रांतावर झाला. बादशहा सिकंदर याच्या स्वारीनंतर या प्रदेशात ग्रीक लोक आले. भारतीय कलेचा व ग्रीक कलेचा संयोग झाला व त्यातून ‘गांधार शिल्पशैली’ उदयाला आली.

सुरुवातीच्या काळात भारतीय शिल्पकलेवर ग्रीक शिल्पांचा प्रभाव होता. एवढेच नव्हे तर ग्रीक कलावंतांकडून या काळात शिल्पे घडवून घेतली जात होती त्यामुळे हा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. उदा. ग्रीक शिल्पावरून उष्णिशा ही केसांची गाठ, वस्त्रे पांघरण्याची पद्‌धत, चेहरे व अवयव कोरण्याची पद्‌धत इत्यादी.

### ● गांधार शिल्पकलेची वैशिष्ट्ये :

गांधार कलेतील शिल्पकलेचे नमुने मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत मात्र चित्रकलेचे नमुने उपलब्ध नाहीत. मुबलक प्रमाणावर आढळून आलेल्या शिल्पांवरून काही ठळक वैशिष्ट्य दिसून येतात.

१) इ.सनाच्या प्रारंभीच्या सुमारास काबूल, कंदहार (अफगाणिस्तानातील) आणि सध्याचा पाकिस्तानमधील पेशावर या भागातील प्रदेश गांधार नावाने ओळखला जात असे. या प्रदेशातील शिल्पशैलीला ‘गांधार शिल्पशैली’ म्हणून ओळखले जाते.

२) भारताच्या पश्चिमेकडील भागांत पार्थिया, बॅक्ट्रिया या भागात ग्रीक राज्ये अस्तित्वात होती. त्यामुळे भारतीय शिल्पकारांचा तात्कालीन ग्रीक-रोमन कलेशी परिचय झाला. ग्रीक व रोमन देवतांचे सुंदर-सुंदर पुतळे पाहून तसेच हिनयान पंथाचा प्रभाव कमी झाल्यामुळे आपल्याही धर्मातील देवतामूर्ती असाव्यात त्या रोमन-ग्रीक देवताप्रमाणे सुंदर असाव्यात अशी संकल्पना पुढे येऊ लागली. त्याला अनुसरूनच बुद्‌ध, बोधीसत्त्वाच्या सुंदर मूर्ती घडवण्यात येऊ लागल्या. त्यामुळे प्राचीन भारतीय पारंपारिक शैली व ग्रीक रोमन शैली यांचा संयोग होऊन नवीन कलाशैली विकसित झाली ती म्हणजेच गांधार शिल्पशैली होय.

३) महायान पंथाच्या उदयामुळे या शिल्पांचे विषय गौतमबुद्‌ध, बोधिसत्व, जातक कथा असेच दिसून येतात.

४) बुद्ध अथवा बोधिसत्व यांच्या डोक्यावरील केस दर्शवताना तो प्रवाही, लयदार झुपक्याद्वारे दर्शविले आहे. तसेच अंगावर वस्त्र घेण्याची पद्धत, वास्तववादी पद्धतीने दाखविलेल्या कपड्याच्या चुण्या यावरून ग्रीक शिल्पशैलीचा प्रभाव सहजपणे जाणवतो.

५) बुद्ध हा योग्याच्या स्वरूपात दाखवला असून बोधिसत्व म्हणजेच ज्ञानप्राप्तीपूर्वीचा सिद्धार्थ बोधीसत्वाच्या स्वरूपात दर्शवत असताना तो राजकुमाराच्या रूपात दर्शवला आहे.

६) मानवाच्या स्वरूपातील बुद्धमूर्तीत दैवत्वाचा प्रत्यय यावा म्हणून काही देवत्वनिदर्शक चिन्हे व वैशिष्ट्यांचा वापर करण्यात आला. त्यात अंडाकृती चेहरा, उष्णिशा ही केसांची गाठ, कपाळावरील ऊर्णा हे तृतीय नेत्रासारखे दिसणारे चिन्ह, कानाची लांब पाळी, डोक्यामागील प्रभावलय इत्यादी. या ठिकाणी उष्णिशा ही केसांची गाठ अपोलो या ग्रीक मूर्तीमध्ये सुद्धा दिसून येते.

७) रोमन टोगा या वस्त्रासारखे वस्त्र, चेहऱ्यावरील हावभाव, कपड्यावरील चुण्या यावरून या शिल्पावर ग्रीक कलेचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.

या शिल्पशैलीमुळे भारतीय शिल्पकलेतील मानवी आकाराला मोहक स्वरूप प्राप्त झाले. मानवी आकारात जिवंतपणा व डौलदार मांसलपणा आला. चेहऱ्यावर मधुर भाव दिसू लागले. बुद्धमूर्तीची निर्मिती ही गांधार शिल्पशैलीने भारताला दिलेली मोठी देणगीच होय. या पूर्वीच्या काळात म्हणजेच हीनयान पंथाच्या प्रभावामुळे बुद्धाचे अस्तित्व फक्त प्रतीकांच्या साहाय्यानेच दर्शवले जात होते. कारण हा पंथ बुद्धांच्या विचारांचे कट्टर पालन करणारा होता आणि बुद्धांनी स्वतःच्या प्रतिमा निर्माण करण्यासंदर्भात विरोध दर्शवला होता. त्यामुळे त्यांचे अस्तित्व केवळ प्रतीकांच्या साहाय्याने दर्शवले जात होते. परंतु ग्रीक शैलीतील देवतांच्या उत्कृष्ट मूर्ती पाहून बुद्धांची मूर्ती घडवण्याचा मोह भारतीय कलावंतांना आवरेना. या काळात महायान पंथ स्थापन झाला आणि मूर्तिपूजेला बौद्धधर्मात महत्त्वाचे स्थान मिळाले. ग्रीकांच्या अपोलोसारख्या देवता समोर ठेवून देवतामूर्ती घडवण्यात आल्या.

### उभा बोधिसत्त्व :

बोधिसत्व ही कल्पना बौद्ध धर्मातील महायान पंथातील आहे. बोधी म्हणजे ज्याच्या अंगी पूर्ण ज्ञान प्राप्त करून घेण्याची क्षमता असते त्यास बोधिसत्व असे म्हणतात.



उभा बोधिसत्त्व

सिद्धार्थ गौतम हे बुद्ध होण्यापूर्वी बोधिसत्व होते. सगळ्या जातक कथा बोधिसत्वाच्याच आहेत. बोधिसत्व सात्त्विक, प्रज्ञावान व परोपकारी असतो. बुद्ध योग्याच्या स्वरूपात तर बोधिसत्व हा राजपुरुषाच्या स्वरूपात कलाक्षेत्रात साकार झाला. अंगावर राजाचा पेहराव, दागदागिने दाखवून साकार करण्याचे श्रेय गांधार कलेकडे जाते. बोधिसत्व मूर्तीला भरदार मिश्या दाखवल्या आहेत. त्यावेळचे जहागीरदार,

देणगीदार यांना बोधिसत्त्वाच्या स्वरूपातील दर्शन घडवण्याच्या हेतूनेही या मूर्ती साकार केल्या गेल्या असाव्यात. मौर्य व शुंग काळातील यक्ष प्रतिमांचे बोधिसत्त्व मूर्तींशी साम्य आढळते.

डोक्यावर उष्णिशा ही केसांची गाठ, झुपकेदार केस अर्धोन्मीलित नेत्र, कानाची लांब पाळी, गळ्यातील कंठहार, त्यावेळी प्रचलित असलेल्या वहाणा दिसून येतात. या शिल्पातील दोन्ही हात कोपरापासून तुटलेले आहेत. ग्रीक पद्धतीचे वस्त्र पांघरले असून वस्त्राचा तलमपणा यातून जाणवतो. उजवा बाहू, छाती, पोट हे भाग अनावृत्त आहेत. अंगावरील शाल व धोतर यांच्या चुण्या समांतर व त्रिमिती दाखवलेल्या आहेत. चेहरा प्रौढ, गंभीर भाव, हात, पाय यांचे दर्शन घडवण्यात गांधार शिल्पकार यशस्वी झाला आहे.

### बुद्धशीर्ष :

कुशाण काळातील चौथ्या व पाचव्या शतकातील गांधार शैलीतील गांधार मध्ये सापडलेले हे शिल्प सध्या व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट म्युझियम, लंडन या ठिकाणी पाहावयास मिळते. हे शिल्प स्टको पद्धतीने प्लास्टर या माध्यमात तयार करण्यात आले आहे. अशी अनेक शिल्पे या परिसरात उपलब्ध झालेली आहेत. त्यापैकी अनेक रंगवलेली आहेत. शिल्पकार मातीच्या मूर्ती उन्हात वाळवून तयार करीत व त्यावर स्टको प्लास्टरची चुनेगच्ची किंवा टेराकोटा शिरे बसवून मूर्ती बनवत, अशा प्रकारची शिरे बहुधा साच्यामधून काढत. ही शीर्षशिल्पे व्यक्तिचित्रणांचे उत्कृष्ट व कलात्मक नमुने आहेत. बुद्धशीर्ष हे त्यापैकी एक. या शिल्पाची प्रमाणबद्धता, डोलदारपणा आणि मोहक रूप यांमुळे शीर्षशिल्प आकर्षक बनले आहे.



बुद्धशीर्ष

भुवया, डोळे, ओठ, कपाळावरील केसांच्या कडा यांतील आखीवरेखीवपणा विलोभनीय आहे. सुरुवातीच्या गांधार शैलीतील मूर्तींच्या चेहऱ्यातील प्रौढपणा जाऊन या शिल्पात यौवनपूर्ण व अत्यंत मोहक रूप शिल्पकाराने साकारले आहे. चेहऱ्यावर गंभीर भाव, अर्धोन्मीलित डोळे, कानाची लांब पाळी ही देवत्वसूचक चिन्हे या शीर्षात दिसतात. लयबद्ध प्रवाही केशकलाप, चेहऱ्याचा तिरकेपणा यामुळे शीर्षात जिवंतपणा व भावनिर्मिती झाली आहे. चेहऱ्याच्या अवयवांचे आदर्शवादी शिल्प व घडण यांवर ग्रीक-रोमन प्रभाव जाणवतो. यातून गांधार कलाकारांच्या उत्कृष्ट शिल्पकौशल्याची प्रचिती येते.

### बुद्धाचे महानिर्वाण (लौरीयाँ तांगाई)

कुशाण राजांच्या कारकिर्दीत गांधारशैली उदयाला आली. बुद्धमूर्तींची निर्मिती गांधार शिल्पशैली भारताला दिलेली मोठीच देणगी होय. या काळात अनेक जातक कथा शिल्पित केल्या गेल्या.

या कलेतील शिल्पाचा उत्कृष्ट नमुना म्हणजेच बुद्धाचे महानिर्वाण हे शिल्प होय. हे उत्थीत शिल्प कथनपर पद्धतीने शिल्पित केलेले आहे. या पद्धतीच्या शिल्पात एका नंतर एक घडलेल्या घटना दर्शविल्या आहेत. वास्तववादी शिल्पशैलीमुळे हे शिल्प सौंदर्यपूर्ण बनले आहे. हे दोन फुट उंच असलेले शिल्प आहे. हे शिल्प पहात असताना यावरील रोमन शिल्पकलेचा प्रभाव जाणवतो. बुद्धाच्या महानिर्वाणाला जमलेले अनेक अनुयायी दर्शविताना त्यांच्या अनेक रांगा अवकाशातून अवतीर्ण होत असल्याचा भास होतो. मागे पुढे आलेल्या आकारामुळे छायाप्रकाशाचा सुंदर

खेळ प्रत्ययास येतो. भारतीय पारंपारीक शैली व रोमन वास्तववादी शैलीचे मिश्रण येथे पहावयास मिळते. रोमन शिल्पकलेतील उत्थित शिल्पातील अभ्यासात्मक खोली, नाट्यपूर्ण, छायाप्रकाश, यथार्थदर्शन सूचित करण्याची पद्धत येथे दिसून येते. त्यानुसार अनेक मानवी आकृत्या आच्छादीत किंवा अंशाच्छादीत पद्धतीने न दर्शवता त्या एकावर एक ओळीत दर्शवल्या आहेत. रोमन कलेचा आणखी एक प्रभाव म्हणजे भावना प्रकट करताना चेहऱ्यावरील हावभावांद्वारे केली आहे. बुद्धांचे महात्म्य दर्शविण्यासाठी बुद्ध आकृती इतर आकृत्यांच्या तुलनेत मोठी दर्शवली आहे. तसेच नैसर्गिकरीत्या बिछान्यावरील व्यक्तिच्या आकृतीप्रमाणे न दिसता ती बुद्धाची उभी आकृती आडवी केल्याप्रमाणे भासते. त्या सभोवताली असलेले लोक आक्रोश करीत आहेत. तसेच काही शोकमग्न व्यक्तिंना काही लोक सावरण्याचा प्रयत्न करीत आहेत. लोकांच्या तीन चार रांगाच्या वर तसेच आकाशातून बुद्धाच्या शरीरावर पुष्पवृष्टी करणारे यक्ष गंधर्व दिसतात. सध्या हे शिल्प कोलकाता येथील इंडियन म्युझियम मध्ये ठेवण्यात आले आहे. हे शिल्प म्हणजे रोमन शिल्पकला व भारतीय पारंपरीक शिल्पकला यांचे सुंदर मिश्रण असे म्हणता येईल.

### ● मथुरा शिल्प शैली

कुशाण कालखंडातील दुसरे महत्त्वपूर्ण शिल्पकलेचे केंद्र म्हणून मथुरा हे शहर ओळखले जाते. यमुनेच्या काठी वसलेले मथुरा हे शहर श्रीकृष्णाची जन्मभूमी व भागवत धर्माचे प्रमुख क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. मौर्य काळापासून ते गुप्तकाळापर्यंत तेथे शिल्प घडवली जात होती. बौद्ध, हिंदू, जैन या सर्व प्रमुख धर्मांची शिल्पे त्या ठिकाणी विपुल प्रमाणात तयार करण्यात आली ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. कुशाणांच्या काळात तर या ठिकाणची शिल्पशैली प्रगत स्वरूपात होती.

मथुरा हे शहर तत्कालीन प्रमुख रस्त्यावर वसलेले असल्यामुळे त्या ठिकाणी इतर संस्कृतीचा परिणाम झाल्याचे दिसून येते. गांधार व मध्यप्रदेश यांना जोडणाऱ्या हमरस्त्यावर वसले असल्यामुळे सहजच संस्कृती बरोबरच शिल्पकलेवरही तत्कालीन वेगवेगळ्या शैलींचा प्रभाव जाणवतो. ग्रीक, इराणी, भारतीय कलाशैलीचा सुरेख संगम या ठिकाणी झालेला दिसून येतो.

मथुरा शहराजवळ असलेले शिल्पसंग्रहालय विशेष उल्लेखनीय आहे. इराणी कलावंतांकडून राजवंशातील राजांचे पुतळे तयार करण्याची कल्पना मथुरा शिल्पकारांनी घेतली असावी. विम कॅडफिसस व कनिष्क राजांचे पुतळे आढळतात. या पुतळ्यावरून व्यक्तिमत्व हुबेहूब साकारण्याचे कसब तत्कालीन कलावंतामध्ये होते हे दिसून येते.

### सम्राट कनिष्काचा पुतळा :

मथुरा शिल्पशैलीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे सम्राट कनिष्क याचे शिल्प. हे शिल्प अतिशय भग्न स्वरूपातील आहे. त्याचे शिर व दोन्ही बाहू तुटलेले आहेत. त्याच्या परिधान केलेल्या लांब वस्त्रावर 'महाराजाधिराज देवपुत्र कनिष्क' असे नाव ब्राम्ही अक्षरात कोरले आहे. त्यामुळे या पुतळ्याबाबत शंका राहत नाही. तत्कालीन सम्राट कनिष्काच्या नाण्यावरही असेच शिल्प दिसून येते. त्यावरून दाढी असलेला चेहरा व डोक्यावरील उंच टोपी यासह हे शिल्प कोरलेले असावे. या सम्राटाने परिधान केलेला पेहराव भारतीय उष्ण वातावरणास पोषक नाही, तर मंगोलियातील वातावरणाशी जुळण्यासारखा हा पोशाख आहे. मंगोलियातील लोक राजे-महाराजे विशिष्ट प्रसंगी या सारखे पोशाख वापरत असावेत असा तर्क बांधता येतो. तुटलेल्या उजव्या हाताचा काही भाग अंगाला चिटकलेला आहे. त्याच हातात दंड हे आयुध धरलेले आहे. तसेच डाव्या हाताच्या मुठीत म्यानासह तलवार धरलेली आहे. लांब वस्त्राच्या आत एक कंबरपट्टा बांधलेला दिसतो. त्याच्या उभा राहण्याच्या आविर्भावातून सम्राटाची ऐट व योद्धा असल्याचे

जाणवते. हे शिल्प पूर्णत: गोल असल्याचे जाणवत नाही तर एखाद्या उत्थित शिल्पाचाच हा एक भाग असावा असे दिसते. व्यक्तिशिल्पाची खासियत दर्शवताना लष्करी पद्‌धतीचा पोशाख व सम्राटाचा थाट हे दर्शवण्यातील शिल्पकाराचे कसब महत्त्वपूर्ण वाटते.

## गुप्तकाळ

### ● गुप्तकाळातील शिल्पकला :

गुप्तकाळातील शिल्पकला हे कुशाण काळातील मथुरा व गांधार शैलीचेच विकसित रूप होय. या शिल्पात कोरीव कामातील सफाईदारपणा, भावदर्शन, भव्यता व प्रसन्नता आढळते. गुप्तकालीन शिल्पे उत्थित व गोल म्हणजेच सर्वतोरचित मोठ्या प्रमाणात आढळतात. हिंदू, बौद्‌ध, जैन देवदेवता व तीर्थंकर यांची दगड व इतर धातूंतही शिल्पे तयार केली आहेत. देखणे चेहरे, आध्यात्मिक समाधानी भाव, चेहऱ्यावरील स्मितहास्य व शांतता हे विशेष गुण या शिल्पांत मोठ्या प्रमाणात आढळतात.

या कालखंडात मथुरा व सारनाथ ही शिल्पकलेची महत्त्वाची दोन प्रमुख केंद्रे होती. दोन्हीही केंद्रांत अतिशय सौंदर्यपूर्ण शिल्पनिर्मिती होत होती.

### मथुरा येथील प्रभामंडलयुक्त उभा बुद्‌ध :

उभ्या अवस्थेतील बुद्‌धाची ही मूर्ती तांबड्या वालुकाश्मात घडवलेली असून तिची एकूण उंची ३.१७ मी. आहे. मूर्तीच्या शिरामागे कमळाच्या अलंकारिक नक्षीची प्रभावळ आहे. ती मथुरेला सापडली व सध्या दिल्लीच्या राष्ट्रीय संग्रहालयात ठेवण्यात आली आहे. ती इ. स. पाचव्या शतकात तयार झाली. यात भगवान बुद्‌ध उंच व सडसडीत दर्शवले आहेत. बुद्‌धाचे दर्शन योग्याच्या स्वरूपात घडवले असून त्याचे शरीर वस्त्राने झाकलेले आहे.

शरीराच्या प्रमाणात या मूर्तीचे शिर लहानसर असल्यामुळे मूर्तीची उंची आहे त्यापेक्षा थोडी जास्त भासते. बुद्‌धाच्या चेहऱ्यावर अत्यंत सौम्य आणि उदात्त भाव दिसत आहेत. अंगावरील वस्त्र अत्यंत तलम व पारदर्शक असल्याचा भास होतो. वस्त्रावरील चुण्या पारदर्शक व लयदार रेषापूर्ण असल्यामुळे एका वेगळ्याच सौंदर्याचा साक्षात्कार होतो. आडव्या चुण्यांमुळे बुद्‌धांची आकृती लयबद्‌ध वाटते. चेहऱ्याच्या मागे असलेल्या प्रभावलयामुळे शिल्पाचे संयोजन अतिशय सौंदर्यपूर्ण बनले आहे. या ठिकाणच्या बुद्‌ध मूर्तीची संकल्पना पूर्ण भारतीय आहे. या कालखंडात तिच्यावर ग्रीक प्रभाव दिसून येतो. तसेच यात बुद्‌धमूर्तीमधील सर्व शारीरिक लक्षणे, बारकावे दिसून येतात. धनुष्याच्या आकाराच्या भुवया, कमळासारखे डोळे, जाड ओठ, गोगलगाईच्या शंखाप्रमाणे केसांचे झुपके, डोक्यावरील उष्णिशा नावाची केसांची गाठ, तळहातावरील चक्र, मत्स्य, त्रिशूल इत्यादी चिन्हे ही सर्व लक्षणे तपशीलवार कोरण्यात आली आहेत. भारतीय शिल्पकलेतील एक सौंदर्यपूर्ण शिल्प म्हणून प्रसिद्‌ध आहे.



मथुरा येथील प्रभामंडलयुक्त उभा बुद्‌ध

## सारनाथ येथील बसलेला बुद्‌ध :

भारतीय शिल्पकलेतील सर्वोत्कृष्ट नमुन्यांपैकी एक शिल्प म्हणून गणलेले सारनाथ येथील बसलेल्या बुद्‌धाचे हे शिल्प. गौतम बुद्‌धांनी ज्ञानप्राप्तीनंतर



सारनाथ येथील बसलेला बुद्‌ध

आपले पहिले धर्मप्रवचन सारनाथच्या मृगोद्यानात दिले. त्या स्मृतीप्रीत्यर्थ शिल्प बनवण्यात आले असून ते चुनारच्या वालुकाश्माचे असून सध्या सारनाथच्या संग्रहालयात पाहावयास मिळते. यात बुद्‌धांनी योगासन घातले आहे, हाताची धर्मचक्र परिवर्तन मुद्रा दर्शवली आहे. खालच्या चौथऱ्यावर त्यांच्या पहिल्या अनुयायांच्या आकृत्या कोरल्या आहेत. ते गुडघे टेकून धर्मचक्रपरिवर्तन करीत आहेत. शेजारी दोन हरणे दाखवली आहेत. सिंहासनावर मूर्तीच्या दोन्ही बाजूस याळी व मकराच्या आकृत्या दिसतात. यात बुद्‌धजीवनातील घटनांना सांकेतिक रूप प्राप्त झालेले होते. याच विषयावरील गांधार शिल्पात या प्रसंगाचे वस्तुनिष्ठ दर्शन घडते तसेच येथे बुद्‌धांची आकृती वैश्विक दाखवण्याच्या दृष्टिकोनातून मोठी दर्शवण्यात आली आहे. त्यातील प्रसंग, कथात्मकता चौथऱ्याच्या खालच्या भागावरच दिसून येते. या ठिकाणी बुद्‌ध आकृती उंच, सडसडीत व नाजूक दर्शवली आहे. शिल्पातील संयोजन त्रिकोणातून दाखवले आहेत. बुद्‌धाचा चेहरा हा शिल्पाचा शिरोबिंदू आहे. मांडीचा भाग हा पाया आहे. बुद्‌धांच्या चेहऱ्यावरील शांत व प्रसन्न भाव शिल्पसौंदर्यात अधिक भर घालतात. धनुष्याकृती भुवया, कमलनेत्र यासारखी वैशिष्ट्ये या मूर्तीत दिसून येतात. चेहऱ्याच्या पाठीमागील प्रभावलय हे कोरीव कामांचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखले जाते. त्याच्या वरती दोन्ही बाजूंना आकाशातून पुष्पवृष्टी करणाऱ्या आकाशगामी अप्सरांची शिल्पे आहेत.

## स्वाध्याय

**प्र.१. दिलेल्या कलाकृतींचे खालील मुद्द्यांनुसार रसग्रहण करा.**

(अ) काळ (ब) स्थान (क) माध्यम

(ड) वैशिष्ट्ये (इ) कलात्मक मूल्ये

(१) दाढीवाला पुरुष

(२) नर्तिका (ब्राँझ)

(३) सारनाथ सिंहस्तंभशीर्ष

**प्र.२. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) भारताची राजमुद्रा ही सम्राट अशोकाच्या .............. या स्तंभावरून स्वीकारली.

(अ) रामपूर्वा (वृषभ स्तंभशीर्ष)

(ब) सारनाथ (सिंह स्तंभशीर्ष)

(क) मथुरा (उभा बुद्‌ध)

(२) गांधार शैलीतील बुद्‌धशीर्ष .............. माध्यमात तयार करण्यात आले.

(अ) तांबडा वालुकाश्म

(ब) स्टको प्लास्टर

(क) पांढरा चुनखडीचा दगड

(३) सिंधू संस्कृतीमधील सर्वात प्रसिद्ध शिल्प 'नर्तिका' या शिल्पाची उंची ............... इतकी आहे.

(अ) १० इंच

(ब) ९ इंच

(क) ४.५ इंच

(४) बुद्धमूर्तींची निर्मिती ही ............... शिल्पशैलीने भारताला दिलेली मोठी देणगी आहे.

(अ) मथुरा

(ब) गांधार

(क) गुप्त

(५) दाढीवाला पुरुष हे शिल्प ............... येथे सापडले.


(अ) हडप्पा

(ब) मोहेंजोदाडो


(क) छन्हु-दारो

**(ब) खालील आकृतिबंध पूर्ण करा.**

(१)




(२)




**प्र.३. टिपा लिहा.**

(१) (गांधार शैलीतील) बुद्धशीर्ष

(२) वृषभस्तंभशीर्ष

(३) सारनाथ येथील बसलेला बुद्ध

**प्र.४. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) मथुरा शिल्पशैलीची माहिती लिहा.

(२) गुप्तकाळातील शिल्पशैली – माहिती लिहा.

**सरावासाठी काही प्रश्न**

१) सारनाथ येथील कोणत्या शिल्पातील संयोजन त्रिकोणातून दाखवले आहे?

२) सिंधू संस्कृतीच्या उत्खननाचे काम कोणत्या संस्थेतर्फे करण्यात आले?

३) दाढीवाला पुरुष या शिल्पावरील शालीवर कोणत्या आकाराची नक्षी कोरली आहे?

४) मातृदेवतेच्या मुकुटासारख्या आभूषणाचा उपयोग कशासाठी करण्यात येत असावा?

५) मुद्रांचा पृष्ठभाग गुळगुळीत करण्यासाठी कोणत्या हत्याराचा उपयोग करण्यात येत असे?

६) कोणत्या घटनेचे स्मारक म्हणून सम्राट अशोकाने सिंहस्तंभशीर्ष उभारला?

७) वृषभस्तंभाखालील वर्तुळाकृती स्तंभशीर्षावर कोणत्या वृक्षाच्या पानांचे अलंकरण कोरलेले आहे?

८) पाटणा येथील यक्षमूर्ती घडवण्यासाठी कोणत्या माध्यमाचा उपयोग करण्यात आलेला आहे?

९) सम्राट कनिष्काच्या पुतळ्याच्या वस्त्रावर कोणते नाव कोरले आहे?

१०) मथुरा येथील प्रभामंडलयुक्त बुद्धाची मूर्ती कोणत्या माध्यमात घडवलेली आहे?

.....

आपल्या भागातील एखाद्या मूर्तिकाराला भेटून शिल्पकलेची माध्यमे, तंत्रे, वैशिष्ट्ये यांबद्दल माहिती मिळवा.